Maharashtra State Board of
econdary & Higher Secondary Education, Pune
R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind
harkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
une-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आपटकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary@msbshse.ac.in Telegram : MAHABOSEC, PUNE.
Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 EPABX -25705000 Fax : 25665807 Secretary(P) : 25651750

क्र.रा.म./परीक्षा-८/४५
पुणे - ४११००४
दिनांक -०२/०१/२०१८

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा(इ.१२वी) फेब्रु-मार्च २०१८ साठी खाजगी विद्यार्थ्यांची अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिबिलंब शुल्कानें परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत..

संदर्भ - क्रं.रा.मं./परीक्षा-८/६०११ दिनांक २८/११/२०१७ चे पत्र.

मंडळ विनियम १९७७ नियम क्र.९३ अन्वये मार्च २०१८ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस खाजगीरित्या (१७ नंबर फॉर्म) प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह ऑफलाईन परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याची मुदत संपल्यानंतरही (१) श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी ३० दिवसाचा कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिदिनी रु.५०/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क, (२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे, त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रती दिन रु.१००/- विशेष अतिविलंब शुल्क व तदनंतरच्या १५ दिवसांकरीता व परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत रु.२००/- प्रमाणे (शासनाचे क्र.एसएससी-२०११(१८५/११)/ उमाशि-२ दिनांक ११ फेब्रु २०१३ च्या पत्रानुसार) अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

विलंब शुल्कानंतरची खाजगी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे कनिष्ठ महाविदयालयांनी स्वहस्ते (Manually) भरुन आवेदनपत्रे विभागीय मंडळामध्ये समक्ष सादर करावयाची आहेत. त्याप्रमाणे सर्व कनिष्ठ महाविदयालयांना लिखित कळवावे. त्याकरीता Blank Template form मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदरची आवेदनपत्र प्रचलित पध्दतीप्रमाणे विभागीय मंडळाने निर्धारित शुल्कासह स्विकारावीत.

परीक्षा	अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.५०/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे)	विशेष अतिविलंब शुल्क अंतिममुदत (रु.१००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे)	अति विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.२००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे)
उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी)	सोमवार दिनांक ०१/०१/२०१८	मंगळवार दिनांक ०२/०१/२०१८ ते मंगळवार दिनांक १६/०१/२०१८	बुधवार दिनांक १७/०१/२०१८ ते बुधवार दिनांक ३१/०१/२०१८

वरील तारखा फक्त या वर्षासाठी निर्धारित करण्यात आलेल्या आहेत.

संदर्भीय पत्रानुसार यापूर्वी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस नियमित, पुनर्परिक्षार्थी, तुरळक विषय, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची अति विलंब, विशेष अतिविलंब व अति विशेष अतिविलंब शुल्काची आवेदनपत्रे ऑन लाईन पध्दतीने भरण्याबाबत सुचित केले होते. तथापि दिनांक २३/१२/२०१७ पासून मंडळाची On Line Form भरण्याची Link बंद होणार असल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे यापूर्वी दिलेल्या वेळापत्रकानुसार **कनिष्ठ महाविदयालयांनी स्वहस्ते (Manually) भरुन आवेदनपत्रे विभागीय मंडळामध्ये समक्ष सादर करावयाची आहेत. त्याप्रमाणे सर्व कनिष्ठ महाविदयालयांना लिखित कळवावे. त्याकरीता Blank Template form मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

प्रचलित पध्दतीप्रमाणे विशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबंधित कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना सोबतच्या नमुन्याप्रमाणे (परिशिष्ट अ) विहीत प्रपत्रांसह पाठविण्यात यावे. तसेच संदर्भीय पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी.

सोबत जोडलेल्या विहीत तक्त्यामध्ये विद्यार्थ्यांबाबतची संपूर्ण अचूक माहिती (कालावधी व दंडाची रक्कम) तपासून सदर तक्ता (परिशिष्ट ब) मा. विभागीय अध्यक्ष यांच्या शिफारशी व स्वाक्षरीसह मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचे मंजूरीकरिता पाठविण्यात यावा. **मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांच्या मंजुरीशिवाय सदर विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.** मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचेकडे विद्यार्थ्यांकडून परस्पर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याबाबतही सर्व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात यावे.

कनिष्ठ महाविद्यालयांकडून प्राप्त झालेला माहितीचा तक्ता (परिशिष्ट अ) राज्यमंडळाकडे पाठविण्यात येऊ नये. तसेच इतर कागदपत्रेही राज्यमंडळाकडे पाठवू नयेत. याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठविण्यात यावा.

राज्यमंडळ कार्यालयाकडून अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र स्विकारण्याची मंजुरी परीक्षा सुरु होण्यापूर्वी घेण्यात यावी. तसेच परीक्षा सुरु होण्यापूर्वी मंजुरी देणे शक्य होईल, अशा बेताने अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काचे आवेदन पत्राचे तक्ते राज्यमंडळाकडे सादर करण्यात यावेत तसेच दिनांक ३१/०१/२०१८ नंतर ऐनवेळेस प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रास मंजूरी सबळ कागदपत्रासह प्रस्ताव पाठवून दिनांक २०/०२/२०१८ पूर्वी मान्यता घेण्यात यावी. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

सोबत- परिशिष्ट 'अ' 'ब' व शुल्क आकारावयाचा तक्ता

सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
१.व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे-०४
२.लेखा शाखा, राज्यमंडळ, पुणे-०४

क्र.पुविमं/शाखा अ/उ.मा./
पुणे-४११ ००५.
दि.०४/०१/२०१८

प्रति,
प्राचार्य, सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
(पुणे, अहमदनगर, सोलापूर)

उपरोक्त राज्यमंडळाच्या राज्यमंडळाच्या पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. तसेच सदर माहिती आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या सुचना फलकावर लावून पालक व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

विभागीय सचिव ,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११ ००५.

याचे कार्यालय

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) फेब्रुवारी–मार्च २०१८

अ.क्र.	तपशील	तारखा
१	लेखी परीक्षा	दिनांक २१/०२/२०१८ ते २०/०३/२०१८
२	प्रात्यक्षिक/श्रेणी/तोंडी परीक्षा	दिनांक ०१/०२/२०१८ ते १७/०२/२०१८
३	आवेदन पत्र नियमित नियमित शुक्लासह भरणे	दिनांक ०२/१२/२०१७ ते २२/१२/२०१७
४	आवेदन पत्र विलंब शुल्कासह भरणे	दिनांक २३/१२/२०१७ ते ३०/१२/२०१७

खाजगी विद्यार्थी आवेदनपत्रे अतिविलंब, विशेष अतिविलंब व अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारणी तक्ता – फक्त कार्यालयीन कामासाठी

अतिविलंब शुल्क प्रतिदिन			अतिविलंब शुल्क प्रतिदिन			अतिविशेष अतिविलंब शुल्क प्रतिदिन		
रु.५० प्रमाणे			रु.१०० प्रमाणे			रु २०० प्रमाणे		
अ.क्र	दिनांक	रक्कम	अ.क्र	दिनांक	रक्कम	अ.क्र	दिनांक	रक्कम
1	01.01.2018	50	2	02.01.2018	150	17	17.01.2018	1750
			3	03.01.2018	250	18	18.01.2018	1950
			4	04.01.2018	350	19	19.01.2018	2150
			5	05.01.2018	450	20	20.01.2018	2350
			6	06.01.2018	550	21	21.01.2018	2550
			7	07.01.2018	650	22	22.01.2018	2750
			8	08.01.2018	750	23	23-01-2018	2950
			9	09.01.2018	850	24	24-01-2018	3150
			10	10.01.2018	950	25	25-01-2018	3350
			11	11.01.2018	1050	26	26-01-2018	3550
			12	12.01.2018	1150	27	27-01-2018	3750
			13	13.01.2018	1250	28	28-01-2018	3950
			14	14.01.2018	1350	29	29-01-2018	4150
			15	15.01.2018	1450	30	30-01-2018	4350
			16	16.01.2018	1550	31	31-01-2018	4550

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

-परिशिष्ट - अ-

परीक्षेचे नांव:----------
विभागीय मंडळाचे नांव : ----------विभागीय मंडळ:--------
प्रकरणिका क्रमांक----------

विद्यार्थ्याची मुदतबाह्य आवेदनपत्रे स्वीकारण्याबाबत शिफारस

इ. १०वी / इ. १२वी

१) विद्यार्थ्याचे नांव ----------

२) शाळेचे / कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव व पत्ता----------

३) शाळेचे / कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक क्रमांक ----------

४) विद्यार्थ्याना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्या बाबत खालील कारणासमोर ( ) खूण करावी.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास.

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

१)----------२)----------

३)----------४)----------

५)----------

६) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांची शिफारस :-

मुख्याध्यापक / प्राचार्य स्वाक्षरी व शिक्का

७) अ) अतिविलंबाचे एकूण दिवस- ---------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम----------

क) दंड कशा प्रकारे भरला - रोखा / धनाकर्ष (डी.डी.) / चलन क्रमांक----------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस ----------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ४६ व ९३ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्याचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,
विभागीय मंडळाचे नांव व शिक्का.